महाराष्ट्र शासन
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
कार्यालय- नियंत्रक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.

दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२२६
ई-मेल - comptmpkv@gmail.com
ac2mpkv@gamil.com

पत्ता :- मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता. राहुरी,
जि. अहिल्यानगर. पिन- ४१३ ७२२

जा.क्र.मफुकृवि/लेखा-२/मा.प्र.वि.शै.शु.र./ २१८ /सन २०२६, दिनांक :-०८/०६/२०२६.

## परिपत्रक

**विषय :- समाज कल्याण व आदिवासी कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडून मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्काच्या प्राप्त रक्कमेबाबत . . .**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, समाज कल्याण व आदिवासी कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडून पदविका/ पदवी/ पदव्युत्तर पदवी / आचार्य पदवी या अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क महाविद्यालयाकडील शिष्यवृत्ती खात्यामध्ये सदर विभागांकडून जमा केले जाते.

तद्नुषंगाने पदविका/ पदवी/ पदव्युत्तर पदवी / आचार्य पदवी या अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क सदर विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर वेळोवेळी विद्यापीठ महसुली उत्पन्नात जमा करणे क्रमप्राप्त आहे.

सबब सर्व प्राचार्य/सहयोगी अधिष्ठाता यांनी शिष्यवृत्ती खात्यामध्ये आज अखेर किती रक्कम बँक खात्यामध्ये शिल्लक आहे याचा आढावा घ्यावा. तसेच या रक्कमेमधून विद्यार्थ्यांना द्यावयाची रक्कम, महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेची रक्कम आणि उर्वरित महसुली उत्पन्नात जमा करावयाची रक्कम वेगवेगळी करावी. विद्यापीठ महसुली उत्पन्नाची रक्कम तातडीने जमा करुन तसा अहवाल शुक्रवार दि. १९ जून, २०२६ पर्यंत ac2mpkv@gmail.com या मेलवर सादर करण्यात यावा.

**प्रस्तुत प्रकरणी प्रथम प्राधान्याने कार्यवाही करण्यात यावी.**

(सदाशिव पाटील)
नियंत्रक,
मफुकृवि, राहुरी.

**(कृ.मा.प)**

प्रत माहितीस्तव :-

१. मा. अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण, मफुकृवि, राहुरी.

२. मा. कुलगुरु महोदय यांचे स्वीय सहाय्यक, मफुकृवि, राहुरी.

प्रत कार्यवाहीसाठी :-

१. सहयोगी अधिष्ठाता, मफुकृवि, राहुरी. (सर्व)

२. प्राचार्य, कृषि विद्यालये, मफुकृवि, राहुरी. (सर्व)

३. प्राचार्य, कृषि तंत्र/निकेतन विद्यालये, मफुकृवि, राहुरी. (सर्व)